



# डॉ. ज्योतिष मित्र मिलिंद (पुणे)

## ज्योतिष अभ्यास, मार्गदर्शन आणि समुपदेशन

संपर्क : ७०५८११५९४७ वेब : www.jyotishmitramilind.in

मंगळ – मंगल की अमंगल




लग्न जमवताना अनेक प्रकारच्या धास्ती घेऊन वर वधू संशोधन सुरु असते. स्थळ कसे असेल, माणसे कशी असतील, मने जुळतील का, संसार सुखाचा होईल ना? कुंडलीवर विश्वास ठेवणारे गुण जुळतील ना ई. या सर्वात जर कोणी भाव खाऊन जात असेल तर मंगळ. संबंधित प्रभावी दशा असते तेव्हाच ते फ़ळ मिळते. एखाद्या पत्रिकेत मंगळाची दशा जी जास्तीत जास्त ७ वर्षे असते ती येऊन गेली असेल किंवा येणारच नसेल तर मंगळ कितीही बिघडलेला असला तरी चहाच्या पेल्यातील वादळेच असतील. आणि मंगळाला मुळात का घाबरायचे? मंगळ जो उर्जा, धीट पणा, शौर्य, स्पष्टवक्तेपणा, धाडसी वृत्ती अशा अनेक गुणांचा कारक आहे. पोलीस, सैन्य दल, सर्जन, अधिकारी जागा, गुप्तहेर खाते अशा अनेक ठिकाणी मंगळ प्रधान व्यक्ती फ़ार प्रभावी ठरु शकते. मंगळ जागा, मालमत्ता देऊ शकतो. मंगळाला पाश्चिमात्य लोक मार्स म्हणजेच योद्धा समजतात. हिंदू लोक मंगळाचा देव गणपती मानतात, ज्याला विघ्नहर्ता म्हणतात तो मंगल च म्हणायला पाहिजे ना. आधिच्या काळी मुली वर फ़ार बंधने असायची. तिने माजघरातून कोणासमोर बाहेर यायचे नाही, डोक्यावर पदर घेऊन च वावरायचे. कोणात मिसळायचे नाही,

दुरुत्तरे करायची नाहीत असा काळ होता. तेव्हा मुलगी मांगलिक असेल तर ती सासरच्या मंडळींना जुमानणार नाही, अन्याय, अत्याचार सहन करणार नाही, प्रतिकार करेल, वागायला धीट असेल तर मनमानी करेल, अशी काहीशी धास्ती लोकांच्या मनात भर करुन राहिली असावी. पण आता काळ बदलला आहे. आज पुरुषाच्या बरोबरीने स्त्री प्रत्येक क्षेत्रात कर्तुत्व गाजवतेय. घराबाहेर पडतेय, जगभर आपला ठसा उमटवतेय. अशावेळी मुलगी अथवा मुलगा मंगळाच्या गुणांचा नसेल, भित्रा, अबोल, अनुत्साही ई असेल तर या जगात त्याचा निभाव लागेल का याचे उत्तर आपणच सांगू शकता. असो. मांगलिक पत्रिकेची थोडक्यात माहिती देऊन हा लेख प्रपंच आटोपता घेतो.

जन्मपत्रिकेमध्ये लग्न म्हणजे प्रथम किंवा चतुर्थ किंवा सप्तम किंवा अष्टम स्थान यापैकी कोणत्याही स्थानात जर मंगळ असेल तर त्याला सामान्यत: मंगळदोष मानले जाते. मंगळदोष असणाऱ्या व्यक्तिला मांगलिक व्यक्ती असे म्हटले जाते.

**प्रथम स्थानातील मंगळ**

लग्न म्हणजे प्रथम स्थानामध्ये मंगळ असल्याने व्यक्ती हट्टी किंवा उग्र स्वभावाची असते. या स्थानात उपस्थित मंगळाची चतुर्थ दृष्टी सुख स्थानावर असल्याने या व्यक्तींना गृहस्थसुखांना मुकावे लागते. सातव्या स्थानातील दृष्टी जोडीदाराशी संबंध बिघडण्यासाठी कारणीभूत ठरते. तर आठव्या स्थानावरील दृष्टी जोडीदारासाठी अडचणी निर्माण करते.

**द्वितीय स्थानात मंगळ**

द्वितीय स्थान धन व कुटंबाचे स्थान असते. हा मंगळ नातेवाईक व आप्तस्वकीयात वादविवाद निर्माण करतो, ज्याचा नकारात्मक प्रभाव व्यक्तीच्या दांपत्यजीवनावर पडतो. या स्थानातील मंगळ पाचव्या, आठव्या व नवव्या स्थानावर प्रभाव टाकतो. त्याचा संततीवर वाईट परिणाम होऊ शकतो. यांना नशिबाचीही साथ मिळत नाही.

**चतुर्थ स्थानातील मंगळ**

चतुर्थस्थानातील मंगळ सातव्या, दहाव्या व अकराव्या स्थानावर परिणाम करतो. हा मंगळ स्थायी संपत्ती तर देतो पण जोडीदाराच्या अभावामुळे येणारे गृहस्थाश्रमातील क्लेशही देतो. मंगळाची दृष्टी सातव्या स्थानात असल्याने जीवनात प्रेमाची कमतरता जाणवते व वैचारिक मतभेद होऊ शकतात. या मंगळामुळे घटस्फोट किंवा जोडीदाराला शारीरिक त्रास होत नसला तरी वैवाहिक सुख मात्र निश्चित कमी होते.

**सातव्या स्थानातील मंगळ**

जोडीदाराच्या म्हणजेच सप्तम स्थानातील मंगळ विवाहासाठी सगळयात जास्त हानीकारक असतो. हा मंगळ जोडीदारच्या स्वभावात उग्रता व जोडीदाराच्या आरोग्याला मारक असतो. या मंगळाची प्रथमस्थान, धनस्थान व कर्मभावावर दृष्टी पडते त्यामुळे करिअरमध्ये समस्या, आर्थिक चणचण तसेच एखाद्या दुर्घटनेची शक्यता वाढते. या स्थानात मंगळ असणाऱ्या व्यक्ती विवाहबाह्य संबंध प्रस्थापित करतात. याच्या अत्युच्च प्रभावामुळे पतीपत्नीमध्ये दुरावा येण्याचे प्रमाण वाढते.

**आठव्या स्थानातील मंगळ**

आठव्या स्थानाचा संबंध कष्ट, भाव, संकट, दु:ख व आयुर्मानाशी येतो. हा मंगळ मानसिक कष्ट देतो, वैवाहिक आनंद नष्ट करतो. शारीरिक व लैंगिक तक्रारी संभवतात. या स्थानातील मंगळ जर वृषभ, कन्या किंवा मकर राशीला असेल तर अशुभ फलाची तीव्रता कमी होते. परंतु मकर राशीतील मंगळ संततीसंबंधी समस्या निर्माण करू शकतो. याशिवाय द्वितीय व बाराव्या स्थानातील मंगळ दांपत्य जीवनावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम करतो.

**बाराव्या स्थानातील मंगळ**

जन्मपत्रिकेत बाराव्या स्थानाला व्ययस्थानही म्हटले जाते. हे स्थान निद्रेचेही आहे. या भावात मंगळ आल्याने दांपत्य सुखामध्ये बाधा येते. लैंगिक इच्छा प्रबळ होते. शुभ ग्रहांच्या अभावामुळे चारित्र्यावर डाग येण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. असे लोक भावुक होऊन आपल्या जोडीदाराला त्रास देऊ शकतात. धनाची कमी वैवाहिक संबंधांवर परिणाम करते. या लोकांना गुप्तरोग व रक्तासंबंधी विकार होण्याची शक्यता असते.

**अपवाद**

१) प्रथम स्थानी मेषेचा मंगळ, चतुर्थात वृश्चिकेचा मंगळ, सप्तमात मकरेचा मंगळ अष्ट्मात कर्केचा मंगळ तर द्वादशात धनेचा मंगळ असल्यास ती कुंडली दोषार्ह नाही असे समजतात.

२) दोषार्ह मंगळ कुंडलीत,१,३,७,८,१२ या पैकी कोणत्याही एका स्थळी जर शनी असेल तर त्या कुंडलीतील मंगळाचा दोष नाहीसा होतो असे समजण्यात येते.

३) बलवान शुक्र अथवा गुरू हा ग्रह सप्तम स्थानात अथवा लग्नात असेल तर मंगळनाशक योग होतो.मंगळाचा दोष रहात नाही.

४) चंद्र केंद्र स्थानांत असेल तर मंगळाचा दोष रहात नाही.

५) चंद्र मंगळ एकत्र असतांना लक्ष्मीकारक योगामुळे मंगळाचा दोष रहात नाही.

६) मंगळासमवेत राहू असतांना मंगळाचा दोष रहात नाही.

मांगलिक दोषातून मुक्त होण्यासाठी विशेष उपाय :

१) सर्वात मोठा उपाय म्हणजे अहंकार आणि रागावर पूर्ण नियंत्रण असणे.

२) श्री हनुमान चालीसा दररोज श्रद्धेने पठण करणे.

३) शिवलिंगाला लाल रंगाची फुले अर्पण करा.

४) मंगळवारी लाल मसूर दान करा.

५) भगवान शिव आणि शक्तीची संपूर्ण भक्तीने पूजा करा.

६) दर मंगळवारी हनुमानजीला केशरी चोळी अर्पण करा.

७) एका चांदीच्या वाटीत मध ठेवल्याने मंगळाचा प्रभावही कमी होतो.

८) घरात येणाऱ्या पाहुण्यांना मिठाई खायला दिल्याने मंगल दोषाचा प्रभाव कमी होतो.

९) जर कुंडलीत मंगळ समस्या निर्माण करत असेल तर मध खाऊ नका, तर तो प्रत्येक मंगळवारी शिवलिंगावर अर्पण करा.

-ज्योतिष मित्र मिलिंद (७०५८११५९४७)

ज्योतिष मित्र मिलिंद